संपादकीय

देशाचे 'गलगोटिया' करण थांबलेच पाहिजे

एआय समिटमधील गलगोटिया गोंधळ ही केवळ एका कार्यक्रमाची चर्चा नाही; ती शासन-व्यवस्थेच्या गुणवत्ता-मानकांची परीक्षा आहे. विकासाचे मॉडेल केवळ घोषणांनी किंवा दृश्य-प्रस्तुतीने सिद्ध होत नाही. ते सिद्ध होते काटेकोर अंमलबजावणी, पारदर्शकता आणि संस्थात्मक उत्तरदायित्वाने. एआय समिटमधील गलगोटिया गोंधळ ही केवळ एका कार्यक्रमाची चर्चा नाही; ती शासन-व्यवस्थेच्या गुणवत्ता-मानकांची परीक्षा आहे. विकासाचे मॉडेल केवळ घोषणांनी किंवा दृश्य-प्रस्तुतीने सिद्ध होत नाही. ते सिद्ध होते काटेकोर अंमलबजावणी, पारदर्शकता आणि संस्थात्मक उत्तरदायित्वाने. देशात २०१४ साली नरेंद्र मोदी यांनी प्रचंड प्रमाणात जाहिरातबाजी आणि इव्हेंट करून कार्यक्षम प्रशासन, वेगवान निर्णयप्रक्रिया आणि उद्योगनिष्ठ धोरणांचे उदाहरण म्हणून गुजरात मॉडेलची प्रसिद्धी करत जनतेची दिशाभूल करून सत्ता मिळवली. त्यानंतर 'काम कमी जाहिराती जास्त'वाले गुजरात मॉडेल संपूर्ण देशावर लादले. गेल्या अकरा वर्षांत वारेमाप घोषणा, मोठमोठे इव्हेंट, पेट्रोल पंपपासून कोविड लसीच्या प्रमाणपत्रापर्यंत सगळीकडे पंतप्रधानांचे फोटो. कोरोनाच्या संकटकाळात रुग्णांना बेड आणि ऑक्सिजन उपलब्ध करून देण्याऐवजी मोबाईल टॉर्च पेटवा आणि टाळ्या-थाळ्या वाजवायला लावण्याचे उद्योग केले. त्यासाठी प्रचंड मोठी प्रचारयंत्रणा राबवून स्वतःची पाठ थोपटून घेतली. या संकटकाळात पीएमकेअर फंड नावाने एक खासगी संस्था उघडून सरकारी म्हणून तिचा प्रचार करत सत्तेचा वापर करून शेकडो, हजारो कोटी रुपये जमा केले. त्यांचे पुढे काय झाले याची माहिती ना संसदेत दिली जाते, ना माहिती अधिकार कायद्याखाली. सत्तेच्या जोरावर बेफामपणे वागायचे, माध्यमांच्या मदतीने जनतेपासून सत्य लपवायचे आणि आभासी चित्र निर्माण करायचे. जनतेला स्वप्नं दाखवत दिशाभूल करत राहायचे ही सरकारची कार्यपद्धती आहे. त्यामुळे सत्तेच्या जवळच्या व्यक्ती आणि संस्थांनीही आपल्या फायद्यासाठी याच कार्यपद्धतीचा अवलंब केला. सरकारी मीडिया आणि प्रचारतंत्राच्या मदतीने तो अनेकदा यशस्वीही झाला. त्यामुळे सरकारसोबतच प्रशासन, व्यक्ती आणि संस्थांनाही या बोगसगिरीची चटक लागली आहे. एआय इम्पॅक्ट समिटमध्ये गलगोटियास नामक खासगी विद्यापीठाने अशाच प्रकारे केलेली बोगसगिरी उघड झाल्याने गेल्या काही वर्षांत देशाचा प्रवास गुजरात मॉडेलपासून गलगोटिया सरकारपर्यंत आल्याचे स्पष्ट झाले. केंद्र सरकारने दिल्लीच्या 'भारत मंडपम'मध्ये पाच दिवसीय एआय इम्पॅक्ट समिट (कृत्रिम बुद्धिमत्ता प्रभाव शिखर परिषद) चे आयोजन केले होते. जगभरातील जवळपास पन्नासहून अधिक देश, गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचई, ओपन एआयचे सॅम ल्टमन यांच्यासारखे टेक कंपन्यांचे दिग्गज सहभागी झाले होते. पंतप्रधानांच्या हस्ते या शिखर परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. जगभरातील कंपन्या, तंत्रज्ञ यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात केलेली संशोधने, तयार केलेली उपकरणे आणि तंत्रज्ञानाचे प्रदर्शन करणारी शेकडो दालने या परिषदेत होती. अनेक भारतीय कंपन्या आणि तंत्रज्ञ यांना या परिषदेच्या माध्यमातून त्यांनी विकसित केलेले तंत्रज्ञान जगासमोर मांडण्याची संधी मिळाली. अनेक कंपन्या, स्टार्टअप्सनी या संधीचे सोने केले. पण अशा जागतिक पातळीवरच्या शिखर परिषदेचे आयोजक असणाऱ्या केंद्र सरकारने गुणवत्तेपेक्षा सरकारच्या जवळच्या असणाऱ्या गलगोटियासारख्या सुमार दर्जाच्या, बोगसगिरी करणाऱ्या गलगोटिया नामक विद्यापीठाला दालन उपलब्ध करून दिले. या दालनात त्यांनी चीनने तयार केलेला रोबो कुत्रा प्रदर्शनात ठेवला. जगभरातून आलेल्या प्रतिनिधींसमोर वृत्तवाहिन्यांना मुलाखती देऊन रोबोट कुत्रा आणि ड्रोन उपकरणे विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये विकसित केल्याचे खोटे सांगितले. पण चिनी सोशल मीडिया हँडल्स आणि माध्यमांनी हा खोटारडेपणा उघडा पाडला. देशाची राष्ट्रीय वृत्तवाहिनी डीडीन्यूजला या संदर्भातील बातम्यांचे व्हिडीओ डिलीट करावे लागले. गलगोटियांच्या बोगसगिरीमुळे जगभरात देशाची नाचक्की झाली. चांगले शिक्षण, संस्कार देऊन प्रज्ञावंतांची पिढी घडविण्याऐवजी भाजप आणि संघपरिवाराशी निगडित वरिष्ठ नेत्यांशी सातत्याने संपर्क ठेवणे. विविध सरकारी उपक्रमांशी स्वतःची भूमिका संलग्न असल्याचे जाहीर प्रदर्शन करून सरकारी लाभ मिळवणे. हा गलगोटिया विद्यापीठाशी संबंधित लोकांचा खरा उद्योग असल्याची सार्वत्रिक चर्चा उत्तर प्रदेश आणि दिल्लीच्या परिसरात आपणास ऐकायला मिळते. देशात राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (छएझ २०२०) लागू केल्यानंतर त्याच्या संपूर्ण अंमलबजावणीची घोषणा करणाऱ्या पहिल्या विद्यापीठांपैकी एक गलगोटिया होते. संस्थापकांनीच विद्यापीठ नरेंद्र मोदींच्या विश्वगुरूच्या संकल्पनेवर वाटचाल करत असल्याचे म्हटले आहे. त्यांनी केलेले दावे आणि वास्तविकता यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. गलगोटिया विद्यापीठाने केवळ सात वर्षांत तब्बल २,४३० पेटंट्स दाखल केल्याचा दावा केला. आयआयटी मद्राससारख्या देशातील प्रतिष्ठित सरकारी संशोधन संस्थेने १९७५ पासूनच्या सुमारे ५० वर्षांत २,५५० पेटंट्स दाखल केल्याची नोंद आहे. त्यामुळे हे विद्यापीठ फक्त खोटारडेपणातच विश्वगुरू आहे का? असा प्रश्न पडतो. जागतिक पातळीवरील शिखर परिषद आयोजित करताना त्यात कोणाला सहभागी करून घ्यायचे. कोणत्या संस्था आणि व्यक्तींना दालने उपलब्ध करून द्यायची याची सखोल पडताळणी करणे आवश्यक असते. त्याचे इजच् (इळश्रश्र जष चरींशीळरश्र) म्हणजे उत्पादन तयार करण्यासाठी लागणाऱ्या सर्व घटकांची संरचित यादी तपासली पाहिजे, ज्यात साधारणपणे घटकाचे नाव, पार्ट नंबर, साहित्याचा प्रकार, पुरवठादार, किंमत, स्तररचना, डिझाइन ओरिजिनॅलिटी तपासणी, आयात केलेल्या घटकांपासून जोडणी करून तयार केलेले उत्पादन आहे की स्वतःच्या संस्थेमध्ये डिझाइन व निर्मिती केलेले, प्रत्यक्ष कार्यक्षमतेचे स्वतंत्र परीक्षण ही सर्व पडताळणी करणे अपेक्षित होते. पण गलगोटियांच्या सरकारशी असणाऱ्या जवळिकीमुळे प्रशासनाने या बाबींची पडताळणी केली नसावी असे वाटते. त्यामुळे गलगोटियांइतकेच आयोजक म्हणून सरकारही जबाबदार आहे. कार्यक्रमादरम्यान पंतप्रधानांच्या सुरक्षेसाठी विशेष संरक्षक गटाकडून ड्झत्र्रकडून स्थळाचा ताबा घेणे ही नियमित सुरक्षा प्रक्रिया आहे. एआय इम्पॅक्ट समिटमध्येही पंतप्रधानांच्या आगमनापासून निर्गमनापर्यंतच्या कार्यकाळात दालने रिकामी करण्यात आली. सहभागी संस्थांच्या प्रतिनिधींना यावेळी बाहेर काढण्यात आले. काही जणांना परत आल्यावर आपल्या दालनातील उपकरणे गायब झाल्याचे निदर्शनास आले. त्यांनी याबाबत समाजमाध्यमांवर पोस्ट करून आपल्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेत. सुरक्षा कारणास्तव स्टॉल्स रिकामे करणे, सादरीकरण थांबवणे किंवा कार्यक्रमाच्या व्यवस्थापनात अडथळे येणे यांसारख्या घटना घडल्याच्या तक्रारी पुढे आल्या. तंत्रज्ञान प्रदर्शनाचा उद्देश नवकल्पनांचा मुक्त आणि पारदर्शक आदानप्रदान असतो; केवळ दृश्य-प्रस्तुती नव्हे. अलीकडच्या काळात सेंटर ऑफ एक्सलन्स या संकल्पनेखाली अनेक खासगी विद्यापीठे मोठे दावे करतात. मात्र संशोधन-प्रामाणिकता, डेटा-पारदर्शकता आणि स्वतंत्र ऑडिट यांची स्पष्ट यंत्रणा नसल्याने हे दावे प्रश्नांकित ठरताहेत. संशोधन दाव्यांचे स्वतंत्र मूल्यांकन कोण करते? सरकारी मंचावर सहभागी होण्यासाठी गुणवत्ता-मानके किती कठोर आहेत? विद्यार्थ्यांच्या नावावर सादर केलेल्या प्रकल्पांचे तांत्रिक स्वामित्व आणि जबाबदारी कोणाची? हे प्रश्न केवळ एका संस्थेपुरते मर्यादित नाहीत; ते भारताच्या उच्च शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेशी जोडलेले आहेत. एआय समिटमधील गलगोटिया गोंधळ ही केवळ एका कार्यक्रमाची चर्चा नाही; ती शासन-व्यवस्थेच्या गुणवत्ता-मानकांची परीक्षा आहे. विकासाचे मॉडेल केवळ घोषणांनी किंवा दृश्य-प्रस्तुतीने सिद्ध होत नाही. ते सिद्ध होते काटेकोर अंमलबजावणी, पारदर्शकता आणि संस्थात्मक उत्तरदायित्वाने. पण दुर्दैवाने विद्यमान सरकारकडे याची मोठी कमतरता आहे. गलगोटियाच्या भंपकगिरीविरोधात युवक काँग्रेसने आंदोलन केले. त्यावरून भाजपने अर्धनग्नपणे आंदोलन केले, अशी टीका करत देशभरात काँग्रेस कार्यालयासमोर आंदोलन केले. पण याच भाजप सरकारच्या कार्यकाळात मणिपूरमध्ये भगिनींची नग्न धिंड काढून अत्याचार करण्यात आले. याची त्यांना लाज वाटली नाही. याबाबत त्यांनी तोंडातून 'ब्र' काढला नाही, आंदोलन केले नाही. देशाचे गेल्या काही वर्षांपासून गलगोटियाकरण सुरू आहे. ते थांबवले नाही तर भविष्य अंधःकारमय असेल हे आर्टिफिशयल इंटेलिजेन्ससुद्धा सांगेल.

टि.सी. हरवला आहे

सुनील दिलीपराव देशपांडे

या नावाचा इयत्ता M.sc.(Chemistry) उत्तीर्ण टी.सी. नगर रोड,बीड या दरम्यान हरवला आहे, कोणाला सापडल्यास खालील भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

:: संपर्क :: ९९६०४२०३८८

पान १ वरून...

मग ठाणे प्रमुख...

एलसीबी चे कर्मचारी जिल्ह्याच्या मुख्यालयी राहून ते पूर्ण जिल्हाभरात कारवाया करतात. इतकेच काय तर अनेकवेळा पोलीस ठाणे आणि चौकी पासून हाकेच्या अंतरावर हे पथक कारवाई करतो तर अनेकवेळा हे पथक आती दुर्गम भागात अफू, हातभट्टी दारू, बनावट दारु कारखाण्यांचा पर्दाफाश करतात. तसेच अनेक ठिकाणी झालेल्या चोऱ्या, दरोडे, खून याचा ही तपास लावणे आणि आरोपींना पडल्याच्या कारवाया एलसीबीच करते असे चित्र आहे. यासह अवैध धंद्यांवर कारवाई, जुगार अड्ड्यावर छापा अशा अनेक कारवाया फक्त एलसीबीच करते. यामागचे गुपीत काय? जे कर्मचारी, अधिकारी पोलीस ठाण्यात असतात त्यांच्या मधूनच एलसीबीचे अधिकारी, कर्मचारी निवडलेले असतात. मग जे एलसीबीला जमत ते स्थानिक पोलिसांना का जमत नाही, जर प्रत्येक कारवाईला एलसीबीच हवी तर मग जिल्हाभरात इतके ठाणे, अनेक अधिकारी, शेकडो कर्मचारी, वाहने यांचा उपयोग काय? की हे स्थानिक पोलीस काय फक्त खाकी घालून मिरवायला आहेत का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जर एलसीबीला गुन्हेगार, आरोपी सापडत असतील तर स्थानिक पोलिसांना का सापडत नाही? तेही माणसं आहेत आणि पोलीस ठाण्यात कार्यरत ही माणसं आहेत. मग फरक काय? ज्या पोलीस ठाणे प्रभारीच्या शहरात बसस्थानकावर एखाद्याचा पाकीट, दागिने चोरी जातात त्या आरोपीचा शोध एलसीबी लावते पण त्या ठाणे प्रभारीला लागत नाही याचे गुपित का? स्थानिक पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कारवाई न करण्यासाठी कोणी हात बांधले की, स्वतः त्यांनीच बांधून घेतलेत असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

ठेवीदारांचा मोर्चा सचिन...

यावेळी शेकडो ठेवीदार डोक्यात मी ठेवीदार अशी टोपी घालून सहभागी झाला आहे. तसेच येथे अनेक राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन या आंदोलनाला पाठिंबा दिला. तसेच बीडचे आ. संदीप क्षीरसागर यांनी ही आंदोलनस्थळी जाऊन ठेवीदारांची भेट घेतली, आस्थेवाईकपणे चौकशी करुन या आंदोलनात तुमच्या सोबत असून, शेवटपर्यंत खांद्याला खांदा लावून लढणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. ठेवीदार आता चक्क राजधानीत धडकल्याने या आंदोलनाची दखल घेऊन मागण्या मान्य करीत ठेवीदारांना न्याय मिळेल अशी आशा व्यक्त केली जात आहे. यावेळी आंदोलकांनी अध्यक्ष, सचिव, संचालक मंडळ, कर्मचारी यांच्या मालमत्ता जप्त करा, जप्त मालमत्तांचे लिलाव करुन ठेवी परत करा यासह एकूण १४ मागण्या घेऊन हे महाएल्गार आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

धनंजय मुंडे यांनी पिक...

नुकसानीचे अहवाल सादर करावेत, अशी आग्रही मागणी धनंजय मुंडे यांनी सभागृहात केली. त्यावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर देत संबंधित नुकसानग्रस्त सर्व जिल्ह्यात तातडीने पंचनामे करण्यात येतील, अशी ग्वाही दिली.

गेवराईत पुतळा उभारणाऱ्यांवर...

शिवरायांचा भव्य अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा स्थापित केला. अनेक वर्षांपासून गेवराईकरांची ही इच्छा असल्याने या कृतीचे शहरात कौतुक होत असले, तरी प्रशासकीय दृष्टिकोनातून हे पाऊल नियमांचे उल्लंघन ठरणारे ठरले आहे. या पुतळा उभारणीमुळे महामार्गावरून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांच्या आणि नागरिकांच्या रहदारीस मोठा अडथळा निर्माण झाला असल्याची नोंद पोलिसांनी घेतली आहे. सरकारी आदेशाचा अवमान करणे आणि सार्वजनिक जागेत विनापरवाना बांधकाम करणे या कारणावरून गेवराई पोलिसांनी गुरनं. १०७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १८९(२), १०, २२३, ३२९(३), २८५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ नुसार वरील सर्व 'बहाद्दरू मावळ्यांवर' गुन्हे दाखल केले आहेत. शिवस्मारकाचा आनंद आणि कायदेशीर कारवाईचा बडगा यामुळे सध्या संपूर्ण गेवराई शहरात आणि जिल्ह्यात या घटनेची मोठी चर्चा सुरू आहे.

गुंड वैभव वराटला...

पोलीस निरीक्षक बीड शहर यांनी वैभव वराट याच्या विरुद्ध एमपीडीएचा प्रस्ताव सादर केला होता. पोलीस अधीक्षक यांनी तो प्रस्ताव जिल्हाधिकारी यांना पाठवला होता. या प्रस्तावाला दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी मंजुरी दिली. यामुळे सदरील इस्माला एलसीबीने ताब्यात घेऊन हर्सूल कारागृहात रवानगी केली आहे.

पंचायत समिती धारूर...

शासकीय कामकाज करीत शासनाचा निषेध नोंदविणे.दि. १९ फेब्रुवारी २०२६ : कार्यालयात येऊन शासकीय कामकाज करीत निवेदनाच्या पाठपुराव्यासाठी निदर्शने. दि. २३ फेब्रुवारी २०२६ : पूर्ण दिवस असहकार आंदोलन. संघटनेचे पदाधिकारी यांनी सांगितले की, शासनाने लवकरात लवकर मागण्यांवर सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल. दरम्यान, या आंदोलनामुळे तालुक्यातील शासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

सरकारी दवाखान्यात सीएस...

वितरण केंद्रात काही औषधांचा तुटवडा असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ पुरवठा सुरळीत करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच, स्वच्छता व्यवस्थेतील त्रुटींवर कंत्राटदाराला नोटीस देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. रुग्णांशी थेट संवाद पाहणीदरम्यान सीएस सोळंके यांनी अनेक रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी थेट संवाद साधला. उपचाराची गुणवत्ता, डॉक्टरांची उपलब्धता, तपासण्यांचा कालावधी आणि कर्मचाऱ्यांचे वर्तन याबाबत त्यांनी अभिप्राय जाणून घेतला. काही रुग्णांनी चांगल्या सेवेसाठी समाधान व्यक्त केले, तर काहींनी तपासणी अहवाल उशिरा मिळत असल्याची तक्रार केली. या तक्रारींवर तत्काळ सुधारणा करण्याचे निर्देश देण्यात आले. शिस्त आणि जबाबदारीवर भर रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन सीएस सोळंके यांनी वेळेवर उपस्थिती, रुग्णांशी नम्र वर्तन आणि आपत्कालीन सेवांमध्ये तत्परता यावर विशेष भर दिला. जिल्हा रुग्णालय हे सर्वसामान्यांचे आधारस्थान आहे. येथे येणाऱ्या प्रत्येकाला सन्मानाने आणि दर्जेदार सेवा मिळाली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. सुधारणा उपक्रमांची घोषणा ओपीडी व्यवस्थापन अधिक सुटसुटीत करण्यासाठी नवीन टोकन प्रणाली स्वच्छता मोहिमेची कडक अंमलबजावणी औषध साठ्याचे नियमित ऑडिटतक्रार निवारण कक्ष अधिक सक्रिय करणे आपत्कालीन विभागात अतिरिक्त मनुष्यबळाची नियुक्ती प्रस्तावित रुग्णांसाठी ठरले देवदूत अधिकारी स्वतः रुग्णालयात येऊन समस्या ऐकत असल्याने रुग्णांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. सीएस सतीश कुमार सोळंके यांच्या या सक्रिय आणि संवेदनशील भूमिकेमुळे जिल्हा रुग्णालयातील सेवा अधिक सक्षम व परिणामकारक होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. रुग्णांच्या हितासाठी थेट मैदानात उतरून काम करणारे सीएस सोळंके हे खऱ्या अर्थाने रुग्णांसाठी 'देवदूत' ठरत असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.

बीड : सध्या पवित्र रमजान महिना सुरू असून आज मंगळवारी पाचवा रोजा आहे. या निमित्ताने रोजा इफ्तार करण्याच्या वेळी शहरात खाद्यपदार्थांची रेलचेल सुरू असून याची सर्वत्र दुकाने सजली आहेत. सायंकाळी ५ पासून रोजेदारांची खरेदीसाठी झुंबड उडत असल्याने बाजारपेठ गर्दीने फुलून गेली आहे.

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

श्री. रविंद्र अ. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, गेवराई जि. बीड यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १४१/२०२६
द्रोपदाबाई भ्र. दिगंबर गाडे व इतर वि. निरंक
(मार्फत – ॲड वा.जी. खेडकर, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे हरिभाऊ पि. दिगंबर गाडे, रा.चकलांबा ता.गेवराई जि.बीड हे / हया दिनांक ०१/१२/२०२५ रोजी अहिल्यानगर ता.जि.अहिल्यानगर येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र.१. द्रोपदाबाई भ्र.दिगंबर गाडे, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा.चकलांबा ता.गेवराई जि.बीड अर्जदार क्र.२. ज्योती भ्र.हरिभाऊ गाडे, वय ३४ वर्षे, धंदा शेती, रा.चकलांबा ता.गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. ३ आदर्श पि. हरिभाऊ गाडे, वय १५ वर्षे अपाक आई अर्जदार क्र. २ ज्योती भ्र. हरिभाऊ गाडे रा.चकलांबा ता. गेवराई जि.बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे हरिभाऊ पि.दिगंबर गाडे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०४/०४/२०२६.

क.लिपीक — कोर्टाचा शिक्का — आदेशावरुन, सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

जाहीर प्रगटन

मा.श्री.रफीक शेख,सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३०७/२०२६
(मार्फत विधिज्ञ-ॲड.आर एस गोरे)

अर्जदार – १.शिवाजी रंगनाथ गायके,वय-५३ वर्षे,धंदा-मजुरी. रा.घोसापुरी,ता.जि.बीड.

विरुध्द निरंक

प्रकरण-बॉम्बे रेग्यूलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत नामे द्रोपदाबाई भ्र.रंगनाथ गायके हे/हया दिनांक २८/१०/२००८ रोजी घोसापुरी, ता.जि.बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार हा मयताचा मुलगा आहे.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.

अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की,सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी.जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:-१८/०२/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख:-०४/०४/२०२६.

क.लिपीक — कोर्टाचा शिक्का — आदेशावरुन, अधिक्षक, दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड

सायं.दैनिक बीड किसान दिनांक २४/०२/२०२६

CHANGE IN NAME

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

Old NAME : BABASAHEB DNYANOBA DHAVLE
CHANGE IN TO MY NEW NAME : DHAVALE BABASAHEB DNYANOBA
PRESENT ADD : SNEH NAGAR, SUBHASH ROAD, BEED, MAHARASHTRA - 431122
MO.9623485687

सायं.दैनिक बीड किसान दिनांक २४/०२/२०२६

CHANGE IN NAME

I DECLARE BY THIS PUBLICATION ABOUT CHANGE IN MY NAME

OLD NAME : SAYYED HARIS SAYYED HABIB
CHANGE IN TO MY NEW NAME : HARIS HABIB SAYYED
PRESENT ADD : NEAR AHEMADIYA MASJID MOMIN PURA BEED ,431122.
MO. 9028452487

जाहीर प्रगटन

तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात
जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.३२९/२०२६
निर्मला गिरधारी बावणे विरुध्द ग्रा.पं.कार्या.चौसाळा

पहा

१. निर्मला गिरधारी बावणे, रा.चौसाळा ता.जि.बीड उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञमार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक आदित्य गिरधारी बावणे यांचा दि.२३-०४-२००६ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास चौसाळा ता.बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालय चौसाळा ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९.०२.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २८.०३.२०२६ ही आहे.

तहसिलदार, बीड

पान ४ वरून...

आ. धनंजय मुंडेंच्या ...

धनंजय मुंडे यांनी तत्काळ पंचनामे करून नुकसानीचे अहवाल शासनास पाठवण्याचा सूचना जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत. या पूर्वी देखील खरीप हंगामात विशेष करून हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात परळी मतदारसंघात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे प्रचंड मोठे नुकसान झाले होते. धनंजय मुंडे यांच्या पुढाकारातून पंचनामे व अन्य व्यवस्थापनाच्या माध्यमातून मिळालेल्या आर्थिक मदतीमुळे शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला होता. त्याच पार्श्वभूमीवर गारपीट व वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची देखील भरपाई शेतकऱ्यांना मिळावी, यासाठी धनंजय मुंडे यांनी पुढाकार घेतला आहे.

स्वच्छता हीच सेवा, ...

पुतळा परिसरात त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. योगेश क्षीरसागर अतिथी म्हणून बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, गाडगे महाराजांनी अंधश्रद्धा, जातिभेद, व्यसनाधीनता आणि वाईट रूढी-परंपरांविरुद्ध कठोर भूमिका घेतली. दीन-दुबळ्यांच्या सेवेला प्राधान्य देत त्यांनी धर्मशाळा, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे तसेच शिक्षणासाठी विविध उपक्रम राबवले. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचावी, ही त्यांची भूमिका होती. गाडगे महाराजांचे जीवन अत्यंत साधे, परंतु विचार अत्यंत उंच होते. कृतीतून समाजाला संदेश देत त्यांनी खरी भक्ती ही समाजसेवेत असल्याचे अधोरेखित केले. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचा आदर्श घेत स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक समता या मूल्यांसाठी कार्य करणे, हीच त्यांना खरी अभिवादनाची भावना ठरेल, असेही डॉ.क्षीरसागर यांनी नमूद केले. याप्रसंगी नगरसेवक शुभम धुत, मंगेश धोंगडे, राजाभाऊ पिंगळे, अशोक तांबारे, अमोल पौळ, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर सिद्दीकी, विठ्ठल गुजर, शुभम कातांगळे, प्रा. रवी शिंदे, विकास यादव, शारदाताई डुलगज तसेच प्रशांत पवार, मोहन राऊत, विक्रम वाघमारे, रमेश घोडके, सुशांत राऊत यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती एस एच पाटील यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १३६/२०२६
गंगाबाई विरुध्द निरंक
(मार्फत – ॲड.डी.ए.जाधव)

ज्याअर्थी मयत नामे सुंदराबाई सुखदेव कदम हे/हया दिनांक १४/०६/२०२५ रोजी मौजे सावता नगर गेवराई ता.गेवराई जि.बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार – १.गंगाबाई भ्र.मारोती धांडे, वय ७९ वर्षे धंदा घरकाम रा.सावता नगर,गेवराई ता.गेवराई जि.बीड

यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सुंदराबाई सुखदेव कदम, सावता नगर गेवराई ता.गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २३/०२/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०४/०४/२०२६.

क.लिपीक — कोर्टाचा शिक्का — आदेशावरुन, सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय क.स्तर,गेवराई

पान ४ वरून...

केज, माजलगावात ...

माजलगावः शहरातून एका १४ वर